# वसई विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग
## थेट मुलाखती (Walk in Interview)

विषय :- कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेत वैद्यकीय अधिकारी व क्ष-किरण सहाय्यक या पदासाठी करार पद्धतीने ठोक मानधन तत्वावर सेवा घेणे.

कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात कोव्हिड-१९ रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी व क्ष-किरण सहाय्यक या पदावर करार पध्दतीवर काम करण्यासाठी इच्छुक उमेद्वारांनी थेट मुलाखती (Walk in Interview) कामी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभाग, मुख्य कार्यालय येथे त्यांचे अर्ज संपूर्ण तपशिलासह त्वरीत सादर करावेत.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | मासिक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | मायक्रोबायोलोजिस्ट | ०१ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची मायक्रोबायोलॉजी एम.बी.बी.एस एम.डी (मायक्रोबायोलोजी) किंवा पी.एच.डी (मायक्रोबायोलोजी) व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र. | Negotiable |
| २ | वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस) | २० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस पदवी आवश्यक व संबंधित मेडिकल कौन्सिलची नोंदणी आवश्यक तसेच ३ वर्षाचा आय.सी.यु. विभागाचा अनुभव आवश्यक. | रु.५४,७००/- |
| ३ | वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) | २० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस. पदवी आवश्यक व इंडियन मेडिकल कौन्सिल कडील नोंदणी प्रमाणपत्र. तसेच ३ वर्षाचा आय.सी.यु. विभागाचा अनुभव आवश्यक. | रु.३८,६००/- |
| ४ | वैद्यकीय अधिकारी (बी.एच.एम.एस.) | २० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एच.एम.एस. पदवी आवश्यक व महाराष्ट्र कौन्सील ऑफ होमिओपॅथी कडील नोंदणी प्रमाणपत्र. तसेच ३ वर्षाचा आय.सी.यु. विभागाचा अनुभव आवश्यक. | रु.३५,०००/- |
| ५ | क्ष-किरण सहाय्यक | ३ | उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण, शासन मान्यताप्राप्त संस्थेतुन "क्ष"किरण अभ्यासक्रम पूर्ण. | रु.१८,७००/- |

अर्ज करण्याची पद्धत :-

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभाग, चौथा मजला, प्रभाग समिती - सी, बहुउद्देशीय इमारत, विरार (पूर्व) येथे संपूर्ण तपशिलासह दि.१६/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० पर्यत सकाळी ११ वाजता या वेळेत अर्ज सादर करावा. सार्वजनिक सुट्टीचा दिवस वगळून अर्जाचा नमुना www.vvcmc.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेला आहे. अर्जासोबत आवश्यकती कागदपत्रे सादर करण्यात यावी.

कंत्राटी/करार पध्दतीने सेवा घेणेची पध्दत :-

अर्ज घेताना मूळ कागदपत्रांची तपासणी करुन अर्ज स्वीकारण्यात येतील. कागदपत्रांची छाननी झाल्यानंतर जे उमेदवार शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करित असतिल त्यांची थेट मुलाखतीद्वारे निवड करण्यांत येईल. थेट मुलाखती नंतर आवश्यकते प्रमाणे सदर पदांच्या उमेदवारांची सेवा घेणेत येईल.

अटी व शर्ती :-

१. उपरोक्त पदांकरीता कालावधी ६ महिने किंवा कोरोना (कोविड १९) प्रादुर्भाव संपेपर्यंत, जे आधी घडले तोपर्यंत. तथापी या पुढे सुध्दा सेवा लागणार असेल तर उमेदवाराच्या सेवा, वर्तणूक इ.बाबी तपासून मुदतवाढ देण्याबातचा निर्णय मा.आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.
२. किमान ३ वर्षे अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. अश्या अनुभवाचा दाखला जोडणे बंधनकारक आहे. तथापी या प्रमाणे उमेदवार उपलब्ध न झाल्यास यात किमान १ वर्षे ते २ वर्षे अनुभव असणाऱ्या उमेदवारांना संधी देण्यात येईल.
३. उपरोक्त पदसंख्येत वाढ किंवा घट करणेचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील.
४. छाननी नंतर योग्य उमेदवारांची निवड करण्याचे अंतिम निर्णय मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना राहील.
५. सदरची सेवा तात्पुरती असल्याने उमेद्वारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरुप करण्यात येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दुरध्वनीवर करण्यात येऊ नये.
६. जिल्हा सिमा बंदी व वाहतूक बंदी विचार करता उमेद्वार हा वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात राहणारा असल्यास त्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
७. मुलाखती पश्चात पात्र वैद्यकीय अधिकारी व क्ष-किरण सहाय्क्क यांनी विहित नमुन्यातील करारनामा भरुन देणे आवश्यक आहे.
८. सदर उमेद्वारांना महानगरपालिका सेवेत कायम होणेकरिता हक्क सांगता येणार नाही. तसेच त्यांना कायम कर्मचाऱ्यांचे लाभ अनुज्ञेय होणार नाहीत.
९. भरती प्रक्रियेदरम्यान प्रथम येणाऱ्या उमेद्वारास प्राधान्य देण्यात येईल.
१०. निवड झाल्यानंतर ३ दिवसांत उमेदवाराने त्याची सेवा पुरवावी लागेल. तथापी उमेदवार हजर न झाल्यास ठेवण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवाराची सेवा घेण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.
११. भरती प्रक्रियेदरम्यान सर्व अधिकार मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित करण्याचे अधिकार मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

सही/-
(डॉ.विजयकुमार द्वासे)
उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य)
वसई विरार शहर महानगरपालिका

जा.क्र.वविशम/वैआवि/९७६/२०२०
दिनांक : ०८ /०९/२०२०

## अर्जाचा नमुना

(वसई-विरार शहर महानगरपालिका ---------------------------------------- या पदासाठी अर्ज)

उमेदवाराचा नजीकच्या काळातील (रुंदी ३.५ से.मी व उंची ४.५ से.मी) आकाराचा फोटो चिटकवून स्वतः साक्षांकीत करावा

प्रति,
मा.आयुक्त सो.
वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार
विरार पूर्व, ता.वसई, जि.पालघर, पिन ४०१ ३०५.

**संपुर्ण नांव मराठी व इंग्रजी (कॅपिटल लेटर)**

| संपुर्ण नांव | मराठी | इंग्रजी (कॅपिटल लेटर) |
|---|---|---|
| १) आडनांव : | ---------------------------------------- | ---------------------------------------- |
| २) स्वत:चे नांव : | ---------------------------------------- | ---------------------------------------- |
| ३) वडिलांचे/पतीचे नाव : | ---------------------------------------- | ---------------------------------------- |
| ४) आईचे नाव : | ---------------------------------------- | ---------------------------------------- |

२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता (पिन कोडसहित)

--------------------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------

संपर्कासाठी दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक : ------------------------------------------------------------

३) अ) जन्मतारीख

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

दि.०१/०९/२०२० रोजीचे वय

| वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

५) शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी व श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५ | | | | |

६) अनुभव-

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकूण वर्षे |
|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | |
| | | | |
| | | | |
| | | | |

७) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१ शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र (१०वी ~ १२वी ~ पदवी)
२ नोंदणी प्रमाणपत्र
३ शाळा सोडल्याचा दाखला

८) राष्ट्रीयत्व : भारतीय / अभारतीय
९) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? : होय / नाही

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :- अर्जदाराची सही------------------

दिनांक :- (नाव ---------------------------)